सन २०१७-१८ करीता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गाकरीता ₹ १५०.०० कोटी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक: राकृवि ०३१७/प्र.क्र. २३/राकृवियो कक्ष

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २८ मार्च, २०१८

वाचा :

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. ०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दि. १३/०४/२०१७
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७
३. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ७-१/२०१७-आरकेव्हीवाय, दि. १५/०५/२०१७
४. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीची समितीच्या २३ व्या बैठकीचे इतिवृत्त क्र. RKV-०३१७/C.R.१४/RKVY Cell, दि. ०९/०६/२०१७
५. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१७ आरकेव्हीवाय/१, दि. १६/०६/२०१७
६. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि ०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि. ०३/०७/२०१७
७. कृषि व पदुम विभागाचा शासन शुध्दीपत्रक क्र. राकृवि ०३१७/प्र. क्र.१४/राकृवियो कक्ष, दि. १८/०९/२०१७
८. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीची समितीच्या २४ व्या बैठकीचे इतिवृत्त क्र. RKV-०३१७/C.R.११/१४-A, दि. २/०१/२०१८
९. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१७-आरकेव्हीवाय/१, दि.३१ जानेवारी, २०१८
१०. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि ०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि. २३/०२/२०१८
११. कृषि व पदुम विभागाचा शासन शुध्दीपत्रक क्र. राकृवि ०३१७/प्र.क्र. २३/राकृवियो कक्ष, दि. १४/०३/२०१८
१२. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१७-आरकेव्हीवाय, दि.१६ मार्च, २०१८

प्रस्तावना :

संदर्भाधिन केंद्र शासनाच्या दि. १५/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये राज्यास चालू वर्षीकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत (राकृवियो) सर्वसाधारण राकृवियोकरीता (Normal RKVY) केंद्र हिस्याचे ₹ ४०८.३२ कोटी प्रवर्गनिहाय (सर्वसाधारण प्रवर्ग ₹३२७ कोटी, अनुसूचित जाती ₹४१.९६

कोटी, अनुसूचित जमाती ₹ ३९.३७ कोटी) व त्यास अनुसरुन राज्य हिस्याचे ₹ २७२.२१ कोटी असे एकूण ₹ ६८०.५३ कोटी निधीचे नियतवाटप मंजूर केले होते.

दि.१६ जुन, २०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाने राज्यास सर्वसाधारण प्रवर्गाचा केंद्र हिस्याचा ₹ १६३.५० कोटी निधी व संदर्भाधिन दि.३१ जानेवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये केंद्र हिस्याचा ₹ ७० कोटी वितरित केले होते. सदर निधी वितरणाच्या अनुषंगाने संदर्भांकित दि.०३ जुलै, २०१७ व दि.२३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्र समरुप राज्य हिस्याचा निधी वितरित करण्यात आला आहे.

आता, संदर्भाधिन केंद्र शासनाच्या दि.१६ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये राज्यास उर्वरित केंद्र हिस्याचा ₹ ९०.०० कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. सदर केंद्र हिस्या समरुप राज्य हिस्सा ₹ ६०.०० कोटी अनुज्ञेय होतो. सबब, राकृवियोंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गासाठी केंद्र व राज्य हिस्याची पुरेशी तरतुद शिल्लक असल्याने सदर निधी वितरित करणे शक्य आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत दि.१५ डिसेंबर, २०१७ रोजी राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीची (SLSC) २४ वी बैठक पार पडली सदर बैठकीत मंजूर झालेल्या नवीन प्रकल्पांना तसेच यापूर्वी मंजूर झालेल्या प्रकल्पांना उपरोक्त केंद्र व राज्य हिस्याचा ₹ १५०.०० कोटी उपलब्ध निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णयः

१. सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी या शासन निर्णयान्वये आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे सर्वसाधारण प्रवर्गाकरिता केंद्र व राज्याच्या ६०:४० आर्थिक सहभागाच्या प्रमाणात एकूण ₹ १५०.०० कोटी निधी (रुपये एकशे पन्नास कोटी फक्त) पुढीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(रक्कम ₹ कोटी)

अ.क्र.	**योजनेचे नाव**	**सर्वसाधारण प्रवर्ग**		
		केंद्र हिस्सा	**राज्य हिस्सा**	**एकूण निधी**
१.	राष्ट्रीय कृषि विकास योजना-सर्वसाधारण राकृवियो	९०.००	६०.००	१५०.००

२. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेकरीता केंद्र हिस्याचा ₹ ९०.०० कोटी (रुपये नव्वद कोटी फक्त) व राज्य हिस्स्याचा ₹ ६० कोटी (रुपये साठ कोटी फक्त), असा एकूण ₹ १५०.०० कोटी निधी (रुपये एकशे पन्नास कोटी फक्त), सन २०१७-१८ करिता केंद्र व राज्य हिस्स्याच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा -

प्रवर्ग	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
सर्वसाधारण	**मागणी क्रमांक डी -३** २४०१- पीक संवर्धन (००) (८००) इतर खर्च (००) (०९) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (६० टक्के केंद्र हिस्सा) (२४०१ ८२३५) ३३-अर्थसहाय्य	**मागणी क्रमांक डी -३** २४०१- पीक संवर्धन (००) (८००) इतर खर्च (००) (११) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (४० टक्के राज्य हिस्सा) (२४०१ A२२५) ३३-अर्थसहाय्य

३. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या ₹ १५०.०० कोटी रक्कमेचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध झालेली ₹ १५०.०० कोटी रक्कम कोषागारातून आहरित करुन आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) मध्ये जमा करावी व तसे शासनास अवगत करावे. सदर ₹ १५०.०० कोटी निधी आयुक्त (कृषि) यांना मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी वर्ग करण्यात यावा.

५. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गाकरिता पुढील अंमलबजावणी यंत्रणांना ₹ १५०.०० कोटी निधी वितरीत करण्यात येत असून त्याबाबतचा प्रकल्प निहाय तपशिल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केला आहे व त्याचा संक्षिप्त गोषवारा पुढीलप्रमाणे -

(रक्कम ₹ कोटी)

अ.क्र.	वितरीत निधीचा अंमलबजावणी यंत्रणानिहाय तपशील	वितरीत निधी
१	आयुक्त (कृषि)	८४.०८
३	आयुक्त (साखर)	१२.००
४	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ	३०.५६
५	आयुक्त (पशुसंवर्धन)	१६.४२
६	आयुक्त (दुग्धव्यवसाय)	५.००
७	संचालक (रेशीम)	१.९४
एकूण		**१५०.००**

६. या शासन निर्णयान्वये केवळ ‘सर्वसाधारण प्रवर्गाकरिता’ निधी वितरीत करण्यात आला असून सर्व विभागांनी / अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांना मंजूर केलेल्या प्रकल्पांतर्गत सर्वसाधारण प्रवर्गासाठी आवश्यक असलेल्या निधीकरिता उपरोक्त रकमेचा विनियोग करावा.

७. सर्व विभागाच्या / अंमलबजावणी यंत्रणांच्या वैयक्तिक लाभाच्या प्रकल्पांतर्गत केवळ आधार संलग्न बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करावे.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१९४८३९८१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सहपत्र :- परिशिष्ट अ

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.03.28 19:55:26 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. मा. मुख्यमंत्री, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. सर्व संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य/ महाराष्ट्र विधान परिषद सदस्य
६. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.आयुक्त (पशुसंवर्धन), पुणे
१२.संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१३.संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१४.संचालक, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१५.संचालक, (रेशीम), विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, नागपूर
१६.महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.

१७.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर

१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य

१९.सहायक संचालक (लेखा-१), कृषिआयुक्तालय, पुणे

२०.वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई

२१.निवड नस्ती.

परिशिष्ट - अ

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्र. राकृवि-०३१८/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि.२८/०३/२०१८ चे सहपत्र

अ. क्र.	प्रकल्पाचे नांव व अंमलबजावणी यंत्रणा	प्रकल्प मंजूरीचे वर्ष	प्रकल्पांची मंजूर / उर्वरित प्रकल्प किंमत (नवीन / जुने प्रकल्प)	२०१७-१८ मध्ये यापूर्वी वितरित निधी	चालू वर्षीच्या निधी वितरणानंतर शिल्लक राहिलेली प्रकल्प किंमत	या शासन निर्णयान्वये सर्वसाधारण प्रवर्गाकरिता वितरित करण्यात येत असलेला निधी
१	२	३	४	५	६	७
१	उन्नत शेती - समृद्ध शेतकरी मोहिम अंतर्गत यांत्रिकीकरण प्रकल्प	१७-१८	३००.००	१९०.१९	१०९.८१	८०.०८
	संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण)	**एकूण**	**३००.००**	**१९०.१९**	**१०९.८१**	**८०.०८**
२	नाफेड मार्फत वाशी, नवी मुंबई येथे निर्यात सहाय्यक पायाभूत सुविधा व प्रक्रिया युनिटसह मल्टि चेंबर आणि मल्टि कमोडिटी शीत गृह उभारणी प्रकल्प	१७-१८	१०.९२	३.००	७.९२	४.००
	संचालक (प्रक्रिया व नियोजन)	**एकूण**	**१०.९२**	**३.००**	**७.९२**	**४.००**
	आयुक्त (कृषि)	**एकूण**	**३१०.९२**	**१९३.१९**	**११७.७३**	**८४.०८**
३	उस तोडणी यांत्रिकीकरण	१७-१८	१५.००	०.००	१५.००	१२.००
	आयुक्त साखर	**एकूण**	**१५.००**	**०.००**	**१५.००**	**१२.००**
४	राज्यातील १० ठिकाणी गोदामांची निर्मिती करुन तेथे वखार पावती सुविधा व ऑनलाईन ट्रेडींग सुविधा उपलब्ध करुन देणे	१७-१८	१२.३२	७.००	५.३२	२.४४
५	वखार महामंडळातर्फे ८ ठिकाणी काढणी पश्चात हाताळणी व्यवस्थेसह मल्टी चेंबर शितग्रहाची निर्मीती प्रकल्प	१७-१८	२२.५०	१.००	२१.५०	१५.८७
६	विदर्भ व मराठवाडयातील १० ठिकाणी गोदामांची निर्मिती करुन तेथे वखार पावती सुविधा व ऑनलाईन ट्रेडींग सुविधा उपलब्ध करुन देणे	१७-१८	१०.१८	७.००	३.१८	३.१८
७	द्रोणागीरी (JNPT) येथे नाशवंत कृषि मालाच्या आयात निर्यातीसाठी सुवीधा केंद्र उभारणे	१७-१८	५.००	१.००	४.००	१.३८
८	थेट पणन सुविधेकरिता वखार महामंडळाच्य गोदामांचे क्षतिग्रस्त ॲस्बेसटॉस पत्र्यांच्या छताऐवजी गॅल्व्हालाईन पत्र्यांचे नवीन छत निर्माण करुन गोदामांचा दर्जा उंचावणे	१७-१८	२२.२०	१३.००	९.२०	४.४३
९	वखार महामंडळाच्या राज्यातील गोदामांच्या फरश्यांची दुरुस्ती दर्जा सुधारणे आणि गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर जिल्हयातील वखार महामंडळांच्या वखार केंद्रांवर सिमेंट रस्त्यांची निर्मिती	१७-१८	२३.९९	१३.००	१०.९९	३.२६
	व्यवस्थापकीय संचालक (वखार महामंडळ)	**एकूण**	**९६.१९**	**४२.००**	**५४.१९**	**३०.५६**
१०	विदर्भ व मराठवाडा विभागात दुग्ध उत्पादन वाढीसाठी विशेष प्रकल्प	१७-१८	१००.००	३०.००	७०.००	१४.९२
११	महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विदयापीठ नागपूर अधिनस्त स्नातकोत्तर पशुवैदयक व पशुविज्ञान संस्था अकोला येथील शैक्षणीक पशुवैदयकीय चिकित्सालय संकुलाचे व निदान प्रयोगशाळेचे बळकटीकरण करणे	१७-१८	४.५०	०.००	४.५०	१.५०
	आयुक्त (पशुसंवर्धन)	**एकूण**	**४.५०**	**०.००**	**४.५०**	**१६.४२**

अ. क्र.	प्रकल्पाचे नांव व अंमलबजावणी यंत्रणा	प्रकल्प मंजूरीचे वर्ष	प्रकल्पांची मंजूर / उर्वरित प्रकल्प किंमत (नवीन / जुने प्रकल्प)	२०१७-१८ मध्ये यापूर्वी वितरित निधी	चालू वर्षीच्या निधी वितरणानंतर शिल्लक राहिलेली प्रकल्प किंमत	या शासन निर्णयान्वये सर्वसाधारण प्रवर्गाकरिता वितरित करण्यात येत असलेला निधी
१	२	३	४	५	६	७
१२	लोकमंगल मल्टीस्टेट सहकारी संस्था, बीबी दारफळ जि. सोलापूर यांचा दूध प्रक्रिया प्रकल्पाची १ LLPD क्षमतावाढ व दुध भुकटी प्रकल्प उभारणी	१७-१८	१२.४०	२.००	१०.४०	३.००
१३	संपतराव देशमुख सह. दूध संघ, कडेपूर जि सांगली यांच्या ५० TLPD दूध प्रक्रिया प्रकल्पाची १ LLPD क्षमतावाढ करणे तसेच, दोन शितकरण केंद्रांची (१० TLPD) उभारणी प्रकल्प	१७-१८	७.७३	१.००	६.७३	२.००
	आयुक्त (दुग्धव्यवसाय)	**एकूण**	**२०.१३**	**३.००**	**१७.१३**	**५.००**
१४	जालना येथे ककुन बाजारपेठ विकास प्रकल्प	१६-१७	६.१९	४.२५	१.९४	१.९४
	संचालक (रेशीम)	**एकूण**	**६.१९**	**४.२५**	**१.९४**	**१.९४**
एकूण			**४५२.९३**	**२४२.४४**	**२१०.४९**	**१५०.००**